# भारतातील वस्तू आणि सेवा कर संकलन आणि विश्लेषण: एक अभ्यास

**डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे, प्रमुख , अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज. ई. मेल : tanangek@gmail.com संपर्क क्र. ८०५५८०८७७२**

---

- **प्रस्तावना:**

वस्तू व सेवा कर हा उत्पादन, विक्री, वस्तुंचा वापर व सेवा यावर भारतभर लागणारा अप्रत्यक्ष कर आहे. राज्य व केंद्र सरकारच्या करांना हा कर म्हणजे पर्याय आहे. वस्तू व सेवा कर हा विक्री किंवा खरेदीच्या किंवा सेवा प्रदानाच्या प्रत्येक स्तरावर लागू व गोळा केला जात आहे. जीएसटी अर्थातच वस्तू आणि सेवा कर हा संपूर्ण देशभरात लागू केला आहे.

केंद्र शासनामार्फत सेवाकर लावला जात होता, या सर्व कराची जी क्रेडिट असते. खरेदीवर भरलेला विक्रीकर याची वजावट मिळाली पाहिजे म्हणजे कराचा बोजा कमी होतो. वस्तू व सेवा करामुळे आता कराचा बोजा नाहीसा होत आहे. पूर्वीची सेवाकर किंवा उत्पादन कर असलेली वस्तू जेव्हा विक्रीसाठी बाहेर यायची तेव्हा त्या वस्तूवर व्हॅट लागायचा. हा कराचा बोजा पुढे वाढत जायचा. मात्र सुरुवातीला भरलेला जो कर आहे. तो नंतर आपण जसे कर भरणार तसतसे वजावट कमी होत जाणार. याचा फायदा कालांतराने अर्थव्यवस्थेला होत जाईल. आता ज्या राज्यात वस्तू सेवांचा उपयोग होईल, त्या राज्याला कर भरावा लागणार आहे. यामुळे वस्तू व सेवा कर प्रणालीने एक देश एक कर या श्रृंखलेत संपूर्ण देश जोडला गेला आहे.

- **पारिभाषिक शब्द:**

वस्तू आणि सेवा कर, केंद्र शासन, केंद्रीय वस्तू आणि सेवा कर, राज्य वस्तू आणि सेवा कर, एकात्मिक वस्तू आणि सेवा कर, केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा कर, उपकर कर, महसूल

- **विषयाची निवड:**

वस्तू आणि सेवा कर हा संपूर्ण देशभरात लागू करून 06 वर्ष पूर्ण होत आहेत. वस्तू आणि सेवा कर पद्धती आणि पूर्वीची कर पद्धती यांच्यातील फरक समजावून घेण्यासाठी, वस्तू व सेवा कराचे दर अभ्यासण्यासाठी, भारतातील कर संकलनात वस्तू व सेवा करामुळे झालेली वाढ अभ्यासण्यासाठी, राज्यनिहाय वस्तू आणि सेवा कर संकलनाचा आढावा घेण्यासाठी, विविध व्यवसाय प्रकारामधून वस्तू आणि कर सेवा कर महसुलाचे योगदान समजून घेण्यासाठी वस्तू आणि सेवा कराचे फायदे आणि तोटे यांचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध विषयाची निवड केली आहे.

- **अभ्यास क्षेत्र:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी भारतातील वस्तू आणि सेवा कर क्षेत्राची निवड केली आहे.

- **गृहीतक:**

भारतातील कर व्यवस्थित वस्तू आणि सेवा करांपासून मिळणाऱ्या महसुलीमध्ये सातत्याने वाढत आहे

- **अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. भारतातील वस्तू व सेवा कराची संकल्पना कारणे, सुरुवात, कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
२.भारतातील वस्तू आणि सेवा कर संकलनाचा आढावा घेणे.
३. वस्तू व सेवा करांच्या प्रकारानुसार एकूण कर महसुलीत झालेल्या वाढीचा अभ्यास करणे.
४. राज्यनिहाय वस्तू आणि सेवा कर संकलनाचा अभ्यास करणे.
५. विविध व्यवसाय प्रकारानुसार वस्तू आणि सेवा कर महसुलीचे योगदान तपासणे.
६. वस्तू आणि सेवा करापासून होणारे फायदे आणि तोटे अभ्यासणे.

- **अभ्यासातील मर्यादा:**

१. प्रस्तुत शोधनिबंध फक्त वस्तू आणि सेवा कर या क्षेत्रा पुरता मर्यादित आहे.

- **भारतात जीएसटी लागू करण्याचे मुख्य कारणे-**

1. एकाधिक कर प्रणाली काढून टाकण्यासाठी
2. विशिष्ट उत्पादनावरील करावरील एकाधिक कर काढून टाकण्यासाठी
3. ऑनलाइन व्यवहारांना परवानगी देण्यासाठी
4. ऑनलाइन रिटर्न भरण्यासाठी
5. कर चुकवणे कमी करण्यासाठी
6. अधिकाधिक व्यवसायांना जीएसटीच्या कक्षेत आणण्यासाठी
7. वस्तू आणि सेवांचा वापर वाढवण्याचा प्रयत्न करण्यासाठी

8. उत्पादनासाठी स्पर्धात्मक किंमती आणण्यासाठी

- **भारतातील वस्तू आणि सेवा करांची (जीएसटीची) सुरुवात:**

वस्तू आणि सेवा करांला भारतात सक्रिय चळवळीत आणण्याची कल्पना २१ व्या शतकाच्या सुरुवातीची आहे.

1. २००० अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकार जीएसटीबाबत चर्चा करत होते. पश्चिम बंगालचे अर्थमंत्री असीम दासगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली कृतीची आखणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती.
2. २००३ वित्त मंत्रालयाचे तत्कालीन सल्लागार विजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली होती. टास्क फोर्सकडून कर सुधारणा सुचवायच्या होत्या.
3. २००४ विजय केळकर यांनी कर प्रणालीला GST ने बदलण्याची सूचना केली. 2006 त्यानंतर केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी २००६ -०७ च्या अर्थसंकल्पात ०१ एप्रिल २०१० पर्यंत जीएसटी लागू करण्याचा प्रस्ताव मांडला.
4. २००८ या समितीने जीएसटी देशात लागू झाल्यास त्याचा रोडमॅप तयार करून अहवाल सादर केला.
5. २००९ समितीने जीएसटीवर चर्चा करण्यासाठी एक पेपर तयार केला. अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी जीएसटीची मूलभूत रचना जाहीर केली.
6. २०१० जीएसटीची अंमलबजावणी १ एप्रिल २०११ पर्यंत पुढे ढकलण्यात आली. २०११ काँग्रेस पक्षाने जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी घटना (११५ वे) दुरुस्ती विधेयक सादर केले. विरोधकांच्या विरोधानंतर हे विधेयक स्थायी समितीकडे मंजूर करण्यात आले.
7. २०१२ राज्यांच्या अर्थमंत्र्यांसमवेत बैठका घेण्यात आल्या आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी ३१ डिसेंबर २०१२ ही अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. २०१३ पी. चिदंबरम यांनी रु.ची तरतूद केली. जीएसटीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यासाठी ९,००० कोटी.
8. २०१४ ज्याप्रमाणे स्थायी समितीने जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी मंजुरी दिली त्याचप्रमाणे लोकसभा विसर्जित झाली आणि विधेयक रद्द झाले. नवीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनी लोकसभेत घटनादुरुस्ती विधेयक (१२२ वे) सादर केले.
9. २०१५ जीएसटीच्या अंमलबजावणीसाठी १ एप्रिल २०१६ ही नवीन तारीख निश्चित करण्यात आली होती. जीएसटी विधेयक लोकसभेत मंजूर झाले परंतु राज्यसभेत नाही.
10. २०१६ राज्यसभेने घटना दुरुस्ती विधेयक मंजूर केले. जीएसटी कौन्सिलने लक्झरी आणि पाप वस्तूंसाठी अतिरिक्त उपकरासह चार स्लॅब संरचनेवर सहमती दर्शविली. २०१७ अखेर ०१ जुलै २०१७ रोजी GST लागू करण्यात आला.

- **GST कार्यपद्धती:**

वस्तू आणि सेवा कर (GST) हा काही वस्तू आणि सेवांच्या किमतीवर लागू होतो. वस्तू आणि सेवांचा व्यवहार करणारे व्यवसाय त्यांच्या उत्पादनाच्या किरकोळ किंमतीत कर जोडतात आणि उत्पादन खरेदी करणारा ग्राहक उत्पादनाची किरकोळ किंमत आणि GST भरतो. जीएसटी म्हणून भरलेली रक्कम व्यापारी किंवा व्यापाऱ्यांद्वारे सरकारकडे पाठवली जाते.

- **पूर्वीची कर पद्धती व जीएसटी यामधील मुलभूत फरक:**

पूर्वी दुकानात खरेदीच्या बिलावर काही वेळा साडे-तेरा टक्के तर काही वेळा सहा टक्के कर हा विक्रीकर कायद्यानुसार लागायचा. मात्र ती वस्तू बनविण्यासाठी लागणारा सेवाकर, वाहतूक कर या वस्तूच्या किंमतीतच अंतर्भूत केला जायचा. मात्र जीएसटी आल्यामुळे हे सर्व कर एकत्र झाले आहेत. यात जीवनावश्यक व दैनंदिन वस्तूंवर सर्वात कमी म्हणजे ५ टक्के,चैनीच्या वस्तूंवर सर्वात जास्त म्हणजे २८ टक्के कर लावण्याचा प्रस्ताव आहे. यातील करश्रेणी ५ टक्के,१२ टक्के,१८ टक्के, व २८ टक्के अशी ठेवण्याचे सध्या प्रस्तावित आहे. आता हीच आकडेवारी आपण घेत असणाऱ्या वस्तूंच्या बिलावर येणार आहे. देवाण-घेवाणीवर वॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागणार नाही.

- **२०२२ साठी वस्तू आणि सेवा कराचे दर.**

**1. कर नाही: (जीएसटी कर नसलेल्या सेवा):**

रु. १००० पेक्षा कमी दर असलेली हॉटेल्स आणि लॉज, IMM अभ्यासक्रम, बँक बचत खाती आणि जन धन योजनेवरील शुल्क. सॅनिटरी नॅपकिन्स, बांगड्या, कच्चा माल, झाडू साठी वापरले फळे, मीठ, दही, नैसर्गिक मध, पीठ, अंडी, भाजीपाला, हातमाग, चण्याचे पीठ, (बेसन), मुद्रांक, छापील पुस्तके ,न्यायिक कागदपत्रे, वर्तमानपत्रे, लाकूड, संगमरवरी, दगडापासून बनवलेल्या देवता सोने, चांदी या मौल्यवान धातूचा वापर न करता राख्या बनवल्या जातात फोर्टिफाइड दूध साल निघते.

**2. ५% चा वस्तू आणि सेवा कर:**

सरकार विविध वस्तू आणि सेवांवर ५% GST आकारते. स्किम्ड, मिल्क पावडर, कोळसा, गोठवलेल्या भाज्या, खते, फिश, फिलेट, कॉफी, चहा, मसाले, पिझ्झा, ब्रेड, रॅकेल, अनब्रँडेड, नमकीन उत्पादने, आयुर्वेदिक औषधे, अगरबत्ती, इन्सुलिन,

कापलेला सुका कैरी, काजू, लाईफबोट इथेनॉल- घन जैवइंधन उत्पादने, हाताने तयार केलेले कार्पेट आणि कापड, मजला आच्छादन हाताने बनवलेल्या वेणी आणि सजावटीच्या ट्रिमिंग

**3. १२% चा वस्तू आणि सेवा कराचे दर :**

सरकार खालील वस्तू आणि सेवांच्या सूचीवर १२% चा कर स्लॅब लागू करते: गोठलेले मांस, उत्पादने, लोणी, चीज, तूप, लोणचे, सॉस, फळांचे रस, टूथपाउडर, नमकीन औषधे, छत्र्या, झटपट अन्न मिक्स, भ्रमणध्वनी, शिलाई मशीन, मानवनिर्मित सूत पाऊच आणि पर्ससह हँडबॅग्ज दागिन्यांची पेटी छायाचित्रे, चित्रे, आरसे इत्यादींसाठी लाकडी चौकटी 12% GST कर असलेल्या सेवा आहेत: बिझनेस क्लास एअर तिकीट १०० रुपयांच्या खाली चित्रपटाची तिकिटे.

**4. १८% चा वस्तू आणि सेवा कराचे दर -**

स्लॅब खालील वस्तू आणि सेवांच्या सूचीवर लागू करते माल खालीलप्रमाणे:

१८% GST करासह वस्तू चवीनुसार परिष्कृत साखर, मक्याचे पोहे, पास्ता, पेस्ट्री आणि केक्स डिटर्जंट्स वस्तू धुणे आणि साफ करणे, सुरक्षा काच, आरसा, काचेची भांडी, पत्रके, पंप, कंप्रेसर चाहते लाइट फिटिंग्ज, चॉकलेट्स, जतन केलेल्या भाज्या, ट्रॅक्टर, आईसक्रीम, सूप, शुद्ध पाणी, डिओडोरंट्स, सुटकेस, ब्रीफकेस, व्हॅनिटी केस चघळण्याची गोळी, शॅम्पू, शेव्हिंग आणि आफ्टर-शेव्ह आयटम, चेहर्याचा मेकअप, आयटम वॉशिंग पावडर, डिटर्जंट्स, रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशीन, वॉटर हीटर्स, दूरदर्शन, धूळ साफ करणारा यंत्र इ.

**5. २८ % वस्तू आणि सेवा कराचे दर :**

सरकार खालील बाबींसाठी २८% कर-स्लॅब दर लागू करते माल खालीलप्रमाणे आहेतः

२८% GST करासह वस्तू २८% GST करासह वस्तू चॉकलेटसह लेपित वॅफल्स आणि वेफर्स सनस्क्रीन, डाई, केसांची कातडी, सिरेमिक फरशा, वॉलपेपर, डिशवॉशर, ऑटोमोबाईल्स, मोटरसायकल, वैयक्तिक वापरासाठी विमान, पान मसाला, तंबाखू, सिगारेट, बिडी, सिमेंट, नौका, वजनाचे यंत्रएटीएम वेंडिंग मशीन्स, एरेटेड पाणी , रेस क्लब बेटिंग, जुगार, हॉटेल, मुक्कामाचे वास्तविक बिल रु.७,५०० च्या वर पंचतारांकित हॉटेल्स मनोरंजन आणि सिनेमा हॉटेल्स, इन्स, गेस्ट हाऊसेस, ज्यांचे दर रात्रभर रु. ५,००० आणि त्यापेक्षा जास्त आहेत.

**तक्ता क्रमांक ०१: भारतातातील वस्तू आणि सेवा कर संकलन (सन २०१७ पासून मार्च २०२३) (रक्कम कोटी रुपयामध्ये)**

| आर्थिक वर्ष | वस्तू व सेवा कर संकलन | वाढ ( टक्केवारीत) |
|---|---|---|
| **२०१७-२०१८** | **७,१९,०७८** | |
| २०१८-२०१९ | ११,७७,३७० | ३८.९२ |
| २०१९-२०२० | १२,२२,११७ | ३.६६ |
| २०२०-२०२१ | ११,३६,८०३ | -७.५० |
| २०२१-२०२२ | १४,७६,००० | २२.९८ |
| २०२२- २०२३ | १८,१०,००० | १८.४५ |

**संदर्भ: Goods and Service Tax Council Report March 2023भारतातातील वस्तू आणि सेवा कर संकलन (सन २०१७ पासून मार्च २०२३)**

**संदर्भ: Goods and Service Tax Council Report March 2023**

तक्ता क्रमांक ०१ मध्ये आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून ते २०२२-२०२३ पर्यंत भारतातील वस्तू आणि सेवा कर संकलनाची स्थिती दर्शवण्यात आली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये वस्तू व सेवा कर संकलनातून सरकारला ७,१९,०७८ कोटी रुपये प्राप्त झाले. यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन सन २०१९ -२०२० मध्ये १२,२२,११७ कोटी रुपये इतकी रक्कम या करापासून सरकारला प्राप्त झाली.. आर्थिक वर्ष २०२० -२०२१ मध्ये कोरोनाच्या महामारीमुळे वस्तू व सेवा करापासून प्राप्त होणाऱ्या महसूल कमी झाला. त्यानंतर त्यामध्ये सातत्याने वाढ होत जाऊन २०२२ -२३ या वर्षांमध्ये वस्तू व सेवा करापासून सरकारला १८,१०,००० कोटी रुपये इतकी उच्चांकी रक्कम प्राप्त झाली. एकूणच गेल्या ०६ आर्थिक वर्षात वस्तू व सेवा करापासून सरकारला मिळणाऱ्या महसुलीमध्ये जवळजवळ ०३ पटीने वाढ झालेली दिसून येते.

- **वस्तू आणि सेवा करांचे (GST) चे प्रकार:**

**वस्तू आणि सेवा करांचे चार प्रकार पडतात यामध्ये**

**1. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (CGST):**

CGST हा वस्तू आणि सेवा कर (GST) चा एक भाग आहे आणि केंद्रीय वस्तू आणि सेवा कायदा २०१६अंतर्गत येतो. हा कर केंद्राला देय आहे. हा कर दुहेरी जीएसटी प्रणालीनुसार आकारला जातो.

**2. राज्य वस्तू आणि सेवा कर (SGST):**

राज्य वस्तू आणि सेवा कर (SGST) राज्यातील उत्पादनांच्या खरेदीवर आकारला जातो. हे राज्य सरकारच्या अखत्यारीत येते. हा कर राज्य सरकारला देय आहे. SGST ने करमणूक कर, राज्य विक्री कर, मूल्यवर्धित कर, प्रवेश कर, उपकर आणि अधिभार यांसारख्या करांची जागा घेतली आहे.

**3. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर (IGST):**

एकात्मिक वस्तू आणि सेवा कर (IGST) आंतर-राज्य व्यवहारांवर लागू केला जातो. हा कर एका राज्यातून दुसऱ्या राज्यात वस्तू आणि सेवांच्या हस्तांतरणावर लागू होतो. केंद्र सरकार हा कर वसूल करते आणि राज्याला वितरित करते. हा कर राज्यांना प्रत्येक राज्यापेक्षा केंद्र सरकारशी थेट व्यवहार करण्यास मदत करतो.

**4. केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा कर (UTGST):**

केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा कर देशाच्या कोणत्याही केंद्रशासित प्रदेशांना वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यावर लागू केला जातो. ही आहेत अंदमान आणि निकोबार बेटे, दमण आणि दीव, दादरा आणि नगर हवेली, लक्षद्वीप आणि चंदीगड. हा कर केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (CGST) सोबत लागू केला जातो.

**तक्ता क्रमांक ०२ : वस्तू आणि सेवांच्या देशांतर्गत पुरवठ्यावर वस्तू आणि सेवा कर शीर्षकाखाली सरकारला मिळालेल्या एकूण महसुलाचा तपशील (रक्कम कोटी रुपयात)**

| वर्ष | केंद्रीय वस्तू आणि सेवा कर | राज्य वस्तू आणि सेवा कर | एकात्मिक वस्तू आणि सेवा कर | उपकर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | २+३+४+५=६ |
| २०२०-२०२१ | २०९९१६ (२४.२४) | २७२८२८ (३१.५१) | ३०३९४६ (३५.१०) | ७९१५२ (८.८०) | ८६५८४२ (१००.००) |
| २०२१-२०२२ | २६९१३७ (२४.५२) | ३४४२१६ (३१.३६) | ३८५३१४ (३५.११) | ९८८७८ (९.०१) | १०९७५४५ (१००.००) |
| २०२२-२०२३ (३१ डिसेंबर२०२२) | २३७६६४ (२४.३३) | ३०११७५ (३०.८३) | ३५१०७६ (३५.९४) | ८६९९३ (८.९०) | ९७६९०८ (१००.००) |

**संदर्भ : Goods and Service Tax Council Report January 2023.**

तक्ता क्रमांक ०२ मध्ये वस्तू आणि सेवांच्या देशांतर्गत पुरवठ्यावर वस्तू आणि सेवा कर शीर्षकाखाली सरकारला मिळालेल्या एकूण महसुलाचा तपशील दर्शवण्यात आला आहे. वस्तू आणि सेवा कर अंतर्गत सरकारला केंद्रीय वस्तू आणि सेवा कर, राज्य वस्तू आणि सेवा कर, एकात्मिक वस्तू आणि सेवा कर आणि उपकर यातून महसूल प्राप्त होते. वस्तू आणि सेवा करांमध्ये केंद्रीय वस्तू आणि सेवा कराचा हिस्सा हा जवळपास २४ % राज्य वस्तू आणि सेवा कराचा हिस्सा जवळपास ३१ टक्के, एकात्मिक वस्तू आणि सेवा कराचा हिस्सा ३५ टक्के आणि उपकराचा हिस्सा ९% इतका असलेला दिसून येतो. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये या सर्व करांपासून सरकारला १८.१०,००० कोटी रुपये इतकी रक्कम प्राप्त झालेली दिसून येते.

- **राज्यनिहाय वस्तू आणि सेवा कर संकलन:**

**तक्ता क्रमांक ०३ सन २०२२ राज्यनिहाय वस्तू आणि सेवा कर संकलन (रक्कम कोटी रुपये)**

| राज्य आणि केंद्रशासीत प्रदेश | डिसेंबर २०२१ | डिसेंबर २०२२ | +/- |
|---|---|---|---|
| जम्मू आणि काश्मीर | ३२० | ४१० | २८% |
| हिमाचल प्रदेश | ६६२ | ७०८ | ७% |
| पंजाब | १५७३ | १७३४ | १०% |
| चंदीगड | १६४ | २१८ | ३३% |
| उत्तराखंड | १०७७ | १२५३ | १६% |
| हरियाणा | ५८७३ | ६६७८ | १४% |
| दिल्ली | ३७५४ | ४४०१ | १७% |
| राजस्थान | ३०५८ | ३७८९ | २४% |
| उत्तरप्रदेश | ६०२९ | ७१७८ | १९% |
| बिहार | ९६३ | १३०९ | ३६% |

| | | | |
|---|---|---|---|
| सिक्कीम | २४९ | २९० | १७% |
| अरुणाचलप्रदेश | ५३ | ६७ | २७% |
| नागालँड | ३४ | ४४ | ३०% |
| म्यानमार | ४८ | ४६ | -५% |
| मिझोरोम | २० | २३ | १६% |
| त्रिपुरा | ६८ | ७८ | १५% |
| मेघालय | १४९ | १७१ | १५% |
| आसाम | १०१५ | ११५० | १३% |
| पश्चिम महाराष्ट्र | ३७०७ | ४५८३ | २४% |
| झारखंड | २२०६ | २५३६ | १५% |
| ओरिसा | ४०८० | ३८५४ | -६% |
| छत्तिसगढ | २५८२ | २५८५ | ०% |
| मध्यप्रदेश | २५३३ | ३०७९ | २२% |
| गुजरात | ७३३६ | ९२३८ | २६% |
| दव आणि दमन | २ | - | -८६% |
| दादरा आणि नगर हवेली | २३२ | ३१७ | ३७% |
| महाराष्ट्र | १९५९२ | २३५९८ | २०% |
| कर्नाटक | ८३३५ | १००६१ | २१% |
| गोवा | ५९२ | ४६० | -२२% |
| लक्षद्वीप | १ | १ | -३६% |
| केरळ | १८९५ | २१८५ | १५% |
| तामिळनाडू | ६६३५ | ८३२४ | २५% |
| पाँडिचेरी | १४७ | १९२ | ३०% |
| अंदमान आणि निकोबार बेट | २६ | २१ | -१९% |
| तेलंगणा | ३७६० | ४१७८ | ११% |
| आंध्रप्रदेश | २५३२ | ३१८२ | २६% |
| लडाख | १५ | २६ | ६८% |
| इतर प्रदेश | १४० | २४९ | ७८% |
| केंद्र अधिकार क्षेत्र | १८६ | १७९ | -४% |
| एकूण | ९१,६३९ | १,०८,३९४ | १८% |

**संदर्भ : The GST Collections December 2022, Finance Ministry by a press release on the PIB on 1st January 2023.**

देशातील या विक्रमी जीएसटी संकलनात सर्वाधिक २८ हजार १०१ कोटी रुपयांचे योगदान महाराष्ट्राने दिले आहे. त्यानंतर कर्नाटक १० हजार ६१ कोटी रुपये, गुजरात ९ हजार २३८ कोटी रुपये, तामिळनाडू ८,३२४ कोटी रुपये, उत्तर प्रदेश ७.१७८ कोटी रुपये, हरीयाणा ६,६७८ कोटी रुपये, दिल्ली ४४०१ कोटी रुपये, आदींचा प्रामुख्याने समावेश आहे. महाराष्ट्रातील जीएसटी संकलन डिसेंबर २०२२ मध्ये २३ हजार २९९ कोटी रुपये होते. यंदा डिसेंबर २०२२ मध्ये ते २८ हजार १०१ कोटी रुपयांवर गेले आहे. ही मागील वर्षांच्या एप्रिलच्या तुलनेत २१ टक्के वाढ आहे. डिसेंबर २०२२ मध्ये काही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी वाढ दर्शविली. यामध्ये दमण आणि दीव, गोवा, लक्षद्वीप, मणिपूर, ओडिशा, अंदमान आणि निकोबार बेटे आणि केंद्राच्या अधिकारक्षेत्राचा समावेश आहे.

- **विविध व्यवसायामधून प्राप्त होणारे वस्तू आणि सेवा कर महसूल:**

**तक्ता क्रमांक: ०४**

**विविध व्यवसायामधून प्राप्त होणारे वस्तू आणि सेवा कर महसूल (आर्थिक वर्ष २०२३)**

**(आकडेवारी शेकडेवारीमध्ये)**

| . | **व्यवसाय प्रकार** | **जीएसटी संकलन शेकडेवारीत** |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक मर्यादित कंपनी | ३४.८३% |
| २ | खाजगी मर्यादित, कंपनी | २७.९४ |
| ३ | मालकी हक्क | १३.२८% |
| ४ | सार्वजनिक क्षेत्र हमी | ९.६४% |
| ५ | भागीदारी | ७.२९% |
| ६ | सोसायटी/क्लब/ट्रस्ट/एओपी | १.३८% |
| ७ | मर्यादित दायित्व भागीदारी | १.१८% |
| ८ | सरकार विभाग | ०.९९% |
| ९ | वैधानिक संस्था | ०.३८% |
| १० | परदेशी कंपनी | ०.३८% |
| ११ | हिंदू अविभक्त कुटुंब | ०.२५% |
| १२ | स्थानिक प्रशासन | ०.२१% |
| १३ | अमर्यादित कंपनी | ०.०१% |
| १४ | फॉरेन लिमिटेड दायित्व भागीदारी | ०.००% |
| १५ | इतर कोणतेही संस्था द्वारे सूचित केलेले समिती | ०.००% |
| १६ | इतर | २.२४% |
| **१७** | **एकूण** | **१००.००%** |

**संदर्भ : Goods and Service Tax Council Report March 2023**

तक्ता क्रमांक ०४ मध्ये व्यवसायाच्या प्रकारानुसार वस्तू आणि सेवा कर महसुलाचे योगदान दर्शविण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये सार्वजनिक मर्यादित कंपनी, खाजगी मर्यादित कंपनी, मालकी हक्क, सार्वजनिक क्षेत्र हमी आणि भागीदारी या व्यवसायामधून जवळपास ९५ टक्के पेक्षा अधिक वस्तू आणि सेवा कराचे संकलन होते. इतर बाबीपासून वस्तू आणि सेवा कर महसूल यांचे प्रमाण नगण्य असलेल्या आपल्याला दिसून येते.

- **वस्तू आणि सेवा कराचे फायदे:**

1.जीएसटी एक पारदर्शक कर आहे आणि अप्रत्यक्ष करांची संख्या देखील कमी करते.

2.नोंदणीकृत किरकोळ विक्रेत्यांसाठी जीएसटी खर्च होणार नाही त्यामुळे कोणतेही छुपे कर नसतील आणि व्यवसाय करण्याची किंमत कमी असेल.

3.लोकांना फायदा होईल कारण किंमती कमी होतील ज्यामुळे कंपन्यांना फायदा होईल कारण खप वाढेल.

4.वस्तूंच्या उत्पादनात आणि वितरणात सेवांचा वापर किंवा उपभोग वाढतो आणि त्याउलट होतो यात शंका नाही.

5.अनुपालन खर्चासह प्रशासन, अधिक गुंतागुंत कमी निर्माण करते.

6.जीएसटी प्रणालीमध्ये, जेव्हा सर्व कर एकत्रित केले जातात, तेव्हा कर आकारणीचा भार उत्पादन आणि सेवांमध्ये समान रीतीने विभाजित करणे शक्य होते.

7.जीएसटीमुळे पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त कर प्रशासन तयार होण्यास मदत होईल.

8. सर्व्हिस टॅक्स, सेंट्रल एक्साईज, लक्झरी टॅक्स, सेल्स टॅक्स इत्यादी अनेक कर एकत्र केले आणि ते सर्व एकाच छताखाली आणले. यामुळे कर गणना आणि संग्रह प्रक्रिया सुलभ केली आहे.

9. जीएसटीमुळे कर वसुलीच्या प्रक्रियेची पारदर्शकता सुधारली आहे.

10. जीएसटीमुळे दीर्घकाळ वस्तू व सेवांच्या किंमती खाली येतील, असे उद्योग तज्ज्ञांचे मत आहे, कारण यापूर्वी अनेक मूल्यवर्धित करामुळे (व्हॅट्स) वस्तू व सेवांच्या किंमती वाढत गेल्या. आता, एकच कर यामुळे ही समस्या दूर होईल.

11. २० लाख रुपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या सर्व्हिस प्रदात्यांना जीएसटी देण्याची गरज नाही. ईशान्येकडील राज्यांमध्ये, उंबरठा कमी आहे - दहा लाख. छोट्या व्यवसायांसाठी हा एक मोठा फायदा आहे, कारण ते वेळ घेणा कराची प्रक्रिया टाळू शकतात आणि त्याऐवजी त्यांच्या व्यवसाय क्रियाकलापांवर लक्ष केंद्रित करू शकतात.

12. जीएसटीमुळे वस्त्रोद्योगासारख्या असंघटित क्षेत्रातही आवश्यकतेची जबाबदारी आणि नियमन येईल. भारतात असंघटित क्षेत्र मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देतात आणि मोठ्या प्रमाणात उत्पन्न कमावतात, परंतु करांच्या उत्तरदायित्वाचा विचार केला तर ते बरीच हतबल असतात. जीएसटी ही विसंगती सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे.

13. सध्याच्या करप्रणालीनुसार वस्तू आणि सेवांसाठी स्वतंत्र कर आकारला जातो. यासाठी कर देयता ठरवण्यासाठी व्यवहार मूल्ये वस्तू आणि सेवांच्या मूल्यांमध्ये विभागली जावी. यामुळे तीव्र गुंतागुंत आणि प्रशासनाची डोकेदुखी वाढते. जीएसटीमुळे हे सर्व संपेल.

14. यापूर्वी एकाधिक अप्रत्यक्ष कर व्यवस्थापनाच्या जटिल कार्याला सरकारला सामोरे जावे लागले. परंतु जीएसटीचा कणा, जीएसटी नेटवर्क (जीएसटीएन) जीएसटी ऑपरेशनशी संबंधित सर्व प्रक्रिया व्यवस्थापित करेल. हे संपूर्णपणे समाकलित केलेले व्यासपीठ आहे जे जीएसटी उपक्रमांचे सुलभ कामकाज सुलभ करेल.

15. केवळ उपभोगाच्या अंतिम गंतव्यावर जीएसटी आकारला जाईल, ज्यायोगे, निर्मात्याकडून किरकोळ विक्रेत्यांकडे दुप्पट कर लावण्यात येईल. आर्थिक विकृती दूर करण्यासाठी ही एक पायरी आहे.

16. जीएसटीमुळे भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) वाढ झाली आहे. देशाची जीडीपी काही काळासाठी आर्थिक कार्यक्षमता आणि वाढ दर्शवते. जीएसटीने बहुपक्षीय उद्योगांना समान कर कायद्यांतर्गत येण्याची हमी दिली आहे ज्यामुळे व्यवसाय कार्य करणे अधिक सुलभ झाले आहे.

17. जीएसटीचा एक मुख्य फायदा म्हणजे करदातानोंदणी करू शकतात, रिटर्न भरू शकतात आणि सर्व ऑनलाईन कर भरू शकतात जीएसटी पोर्टलवर. प्रक्रियेत अशी प्रणाली आहेत जी पुरवठादार आणि खरेदीदाराच्या पावत्याची तुलना आणि जुळवून घेतील. ही यंत्रणा कर घोटाळा आणि कर चोरीस प्रभावीपणे नियंत्रित करेल. त्याच वेळी, हे संरचित आणि संघटित पद्धतीने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेकडे व्यवसायाचा उच्च प्रवाह सुनिश्चित करेल.

18. पूर्वीच्या व्हॅट प्रणालीमध्ये, ई-कॉमर्स व्यवसायांना कर अनुपायांच्या बाबतीत भिन्न वागणूक मिळाली. परंतु जीएसटीने यासंदर्भातील सर्व गोंधळ दूर केले आहेत. संपूर्ण ई-कॉमर्स क्षेत्र, पॅन-इंडिया आता जीएसटी कायद्यांतर्गत चांगल्या तरतुदींचे पालन करतो. यामुळे आंतरराज्य वस्तूंच्या हालचालींशी संबंधित गुंतागुंत देखील दूर केल्या आहेत.

- **वस्तू आणि सेवा कराचे तोटे:**

1. जीएसटी हा पूर्णपणे आयटी-चालित कायदा आहे. ही कल्पना कादंबरीची असली तरी, ही व्यवस्था संपूर्णपणे अंमलात आणण्यासाठी भारतातील सर्व राज्ये आवश्यक पायाभूत सुविधांनी सुसज्ज नाहीत.

2. ज्या कंपन्या आपले व्यवसाय एकाधिक राज्यांत चालवतात त्यांना त्या सर्व राज्यांत नोंदणी करावी लागते. हे यापूर्वी अस्तित्त्वात नसलेल्या अतिरिक्त जटिलतेची पातळी जोडते.

3. जीएसटी लागू झाल्यानंतर काही वस्तूंचा जास्त खर्च होण्याची दाट शक्यता आहे. विमा नूतनीकरण प्रीमियम, हेल्थकेअर, कुरिअर सर्व्हिसेस, डीटीएच सेवा यासारख्या खर्चाच्या वस्तू महागड्या होतील - आपल्यातील लाखो लोक दररोज वापरतात.

4. जीएसटीने "अपंगत्व कर" हे टोपण नाव मिळवले कारण त्यात व्हीलचेयर, श्रवणयंत्र, ब्रेल कागदपत्रे इत्यादी वस्तू करांच्या जागी ठेवल्या आहेत.

5. जीएसटी नेटने आतापर्यंत पेट्रोल आणि पेट्रोलियम पदार्थांना वगळले आहे. जीएसटीमागील प्रेरणास्थान असलेल्या "कर एकीकरण" या कल्पनेने हे काम करत नाही. प्रत्येक राज्य या उत्पादनांवर स्वतःचा कर लावते. हे उद्योग किंवा त्यांच्याशी संबंधित उद्योगदावा करू शकणार नाहीत इनपुट टॅक्स क्रेडिटवर.

6. कर अधिकारी आणि इतर संबंधित अधिकार्यांना नवीन नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि देखरेखीसाठी व्यापक आणि विपुल प्रशिक्षण आवश्यक आहे.

7. काही इकॉनॉमिस्ट म्हणतात की भारतातील जीएसटी रिअल इस्टेट मार्केटवर नकारात्मक परिणाम करेल. यामुळे नवीन घरांच्या किमतीत ८ टक्क्यांची भर पडेल आणि मागणी सुमारे १२ टक्क्यांनी कमी होईल.

8. काही तज्ञ म्हणतात की CGST(Central GST), SGST(State GST) ही केंद्रीय अबकारी/सेवा कर, VAT आणि CST ची नवीन नावे आहेत. त्यामुळे कराच्या थरांच्या संख्येत मोठी घट झालेली नाही.

9. काही किरकोळ उत्पादनांवर सध्या फक्त चार टक्के कर आहे. जीएसटीनंतर कपडे आणि कपडे आणखी महाग होऊ शकतात.

10.जीएसटीचा सर्वात लक्षणीय तोटा म्हणजे लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यांसाठी कराचा बोजा वाढला आहे.

- **सारांश:**

वस्तू आणि सेवा कर हा उत्पादन, विक्री, वस्तूंचा वापर व सेवा यावर भारतभर लावणारा अप्रत्यक्ष कर आहे. या कर प्रणाली मुळे "एक देश - एक कर" या शृंखलेत संपूर्ण देश जोडला गेला आहे. केंद्रीय वस्तू आणि सेवा कर, राज्य वस्तू आणि सेवा कर, एकात्मिक वस्तू आणि सेवा कर, केंद्रशासित प्रदेश वस्तू आणि सेवा कर असे चार प्रकार आहेत. भारतामध्ये कर

सुखविगिरीला आळा घालण्यासाठी, अधिकाधिक व्यवसायांना वस्तू व सेवा कर कक्षेत आणण्यासाठी, करातील गुंतागुंत कमी करण्यासाठी, वस्तू आणि सेवा कर लागू करण्यात आला. ०१ जुलै २०१७\ रोजी भारतात संपूर्ण देशभर वस्तू आणि सेवा कराची अंमलबजावणी करण्यात आली. सन २०१७ पासून भारतातील वस्तू व सेवा कर संकलनामध्ये सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते. सरकारला या करापासून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होताना दिसून येतो. वस्तू आणि सेवा कर संकलनामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक दिसून येतो त्यानंतर कर्नाटक, गुजरात, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, हरियाणा या राज्यांची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली दिसून येते. वस्तू कर संकलनामध्ये सार्वजनिक मर्यादित कंपन्या, खाजगी मर्यादित कंपन्या, मालकी हक्क, सार्वजनिक क्षेत्र हमी, भागीदारी या माध्यमातून जवळजवळ 95 टक्के पेक्षा अधिक वस्तू व सेवा कर संकलन होताना दिसून येतो. वस्तू आणि सेवा करामुळे कर व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणलेली दिसून येते, करामधील किचकटपणा कमी झालेला दिसून येतो. पारदर्शक आणि भ्रष्टाचार मुक्त कर प्रशासन तयार होण्यास मदत होत आहे, कर वसुली प्रक्रियेत पारदर्शकता आलेली दिसून येत आहे, कर व्यवस्थित घोटाळा कमी होण्यास मदत होत आहे, ज्याप्रमाणे वस्तू आणि सेवा करांच्या अंमलबजावणीमुळे अर्थव्यवस्थेत काही अनुकूल परिणाम झाले. तसे या कर प्रणाली मुळे काही प्रश्नही निर्माण झाले. जसे या कराच्या अंमलबजावणीसाठी पायाभूत सुविधा काही राज्यांमध्ये नाहीत, या करामुळे कर व्यवस्थित अधिक जटिलता निर्माण झाली, काही वस्तूंचा जास्त खर्च होऊ लागला, कर अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना विपुल प्रशिक्षणाची आवश्यकता भासू लागली, रिअल इस्टेट मार्केटवर या कराचा नकारात्मक परिणाम झाला, लहान आणि मध्यम आकाराच्या कंपन्यावर या कराचा बोजा वाढत गेला, वस्तू आणि सेवा करायच्या ०६ वर्धापन दिनानिमित्त वस्तू आणि सेवा कर प्रवासातील आपण एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहोत. कारण वस्तू व सेवा करांचे फायदे मजबूत दिसत आहेत. कारण अर्थव्यवस्था सुधारत आहे आणि परदेशी उद्योग नवीन आधार शोधत आहेत. जर सरकारने उद्योगांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला तर भारत व्यवसायासाठी एक अनुकूल ठिकाण म्हणून उदयास येऊ शकतो आणि अर्थव्यवस्था मजबूत संकलनासह महामारीनंतरच्या वाढीची कहाणी सुरू ठेवू शकते. वस्तू आणि सेवा कर भारतात काही हेतूने लागू करण्यात आला. ते हेतू आज काही अंशी साध्य होताना दिसत आहेत.

- **संदर्भ:**

1]. https://www.gstindia.com/about/

2].https://www.thequint.com/news/business/india-gst-most-comp lex-28-percent- slab-second-highest-rate-in-world-world-bank

3]. https://www.bankbazaar.com/tax/gst.html

4]. https://economictimes.indiatimes.com/gst

5].https://en.wikipedia.org/wiki/Goods_and_Services_Tax_(India)

6]. https://gst.caknowledge.in/impact-gst-automobile-sector/

7]. http://www.ey.com/in/en/newsroom/news-releases/ey-gstimpact- on-the-auto- industry

8]. https://www.legalraasta.com/gst/impact-of-gst-on-automob

9] https://www.fincash.com/l/mr/gst/goods-and-services-tax-india.

10] Economics Survey Report 2023